(इंग्रजी भाषेत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद.)

मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अधिकारितेत

सामान्य मूळ दिवाणी अधिकार क्षेत्र

वाणिज्यिक दावा (एल ) क्रमांक २९३१९/२०२५

मध्ये

अंतरिम अर्ज (एल) क्र.२९४७०/२०२५

देसाई हॉस्पिटल्स व्हेंचर्स एलएलपी आणि अन्य , ....अर्जदार

.....

देसाई हॉस्पिटल्स व्हेंचर्स एलएलपी आणि अन्य , ....वादी

विरुद्ध

डीएचआय ग्लोबल होल्डिंग्ज लि. (यूके) आणि इतर, ....प्रतिवादी

<u>ह्यांच्या मधील प्रकरणात</u>

---

श्री. आशिष कामत, ज्येष्ठ वकील,सह श्री. हर्ष मुरजानी,श्री. स्मीत सावला, श्री. मानस भिंडोरा, श्री. अनिश सहापूरकर, मेसर्स एसएचएस चेंबर्स यांच्या सूचनेनुसार अर्जदार/वादीसाठी.

श्री. मुस्तफा डॉक्टर, वरिष्ठ वकील सह मिस. स्नेहा जयसिंग, मिस. जयधर शाह, श्री.

मनन पारेख श्री . वैभव गुलियानी, मेसर्स भरुचा भागीदार यांच्या सूचनेनुसार प्रतिवादी क्रमांक १ साठी.

श्री. कार्ल तांबोळी सह श्री. झहान सेटलवाड, मिस. स्नेहा जयसिंग, मिस. जयधर शाह, श्री. मनन पारेख , श्री. वैभव गुलियानी, मेसर्स भरुचा भागीदार यांच्या सूचनेनुसार, प्रतिवादी क्रमांक ३ साठी.

मिस. स्नेहा जयसिंग सह मिस. जयधर शाह, श्री. मनन पारेख , श्री वैभव गुलियानी,भरुचा भागीदार, यांच्या सूचनेनुसार, प्रतिवादी क्रमांक २, ४ आणि ५ साठी.

न्यायमंच : न्या. संदीप व्ही. मारणे.

न्यायनिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक : १५ ऑक्टोबर २०२५.

न्यायनिर्णय अधिघोषीत केल्याचा दिनांक : १७ ऑक्टोबर २०२५.

न्यायनिर्णय :

१. वादींनी प्रस्तुतचा अंतरिम अर्ज दाखल करून १४ ऑगस्ट २०२५ रोजीच्या समाप्ती सूचनेवर स्थगिती मागितली आहे आणि १ मार्च २०१८ रोजीचा मास्टर फ्रँचायझी अग्रीमेंट ( असा करार ज्यामध्ये मूळ कंपनी (फ्रँचायझर) एका विशिष्ट प्रदेशात नवीन फ्रॅन्चायझीची निवड करण्याचा, त्यांना प्रशिक्षण देण्याचा आणि त्यांच्या व्यवसायाचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार एका व्यक्तीला किंवा संस्थेला देते ) (२०१८ चा एमएफए) समाप्त करण्याची मागणी केली आहे . वादीने प्रतिवादींना २०१८ च्या एमएफए, प्रदेश नियुक्ती आणि २६ मार्च २०१८ चा त्याग करार ( असा

करार ज्यामध्ये मास्टर फ्रँचायझी , स्वेच्छेने आणि काही विशेषतः परिस्थितीमध्ये फ्रँचायझरच्या कोणत्याही दाव्यापासून किंवा जबाबदारीपासून स्वतःला मुक्त करतो. )आणि २३ मार्च २०१८ च्या असाईनमेंट (नियुक्ती) आणि नोव्हेशन (नवीनीकरण) कराराच्या वादींच्या कामगिरीत अडथळा आणण्यापासून किंवा हस्तक्षेप करण्यापासून रोखण्यासाठी तात्पुरता मनाई आदेश मागितला आहे. वादीने प्रतिवादींविरुद्ध २०१८ च्या एमएफए, प्रदेश नियुक्ती आणि २६ मार्च २०१८ च्या त्याग करार आणि २३ मार्च २०१८ च्या अधिकार हस्तांतरण आणि नवीनीकरण कराराच्या वादींच्या कामगिरीत अडथळा आणणाऱ्या /हस्तक्षेप करणाऱ्या कोणत्याही संस्थेसोबतच्या कोणत्याही कराराच्या अंमलबजावणी बद्दल खुलासा मागितला आहे. वादींनी प्रतिवादी क्रमांक ३ ते ५ ला २० नोव्हेंबर २०२४ च्या कराराच्या पूर्ततेमध्ये कार्य करण्यापासून रोखण्यासाठी तात्पुरता मनाई आदेश मागितला आहे ज्यामध्ये २०१८ च्या एमएफए अंतर्गत प्रतिवादी क्रमांक १ आणि २ चे हक्क आणि दायित्वे हस्तांतरित करणे किंवा व्यक्त करणे विक्री हस्तांतरण करण्याचा परिणाम आहे. वादींची प्रतिवादी क्रमांक ३ ते ५ विरुद्ध नियुक्त केलेल्या प्रदेशांमध्ये थेट केस प्रत्यारोपण संबंधित उत्पादने आणि सेवांशी संबंधित व्यवसाय स्थापित करण्याबद्दल किंवा २०१८ च्या एमएफए अंतर्गत वादींच्या फ्रँचायझी व्यवसाय (म्हणजे एक असा करार ज्याद्वारे एक व्यक्ती (फ्रँचायझी )दुसरी प्रस्थापित कंपनीच्या (फ्रँचायझर) ब्रॅण्ड, नाव, उत्पादने आणि व्यवसाय मॉडेल वापरण्याचे अधिकार विकत घेते. ) यात हस्तक्षेप

करण्यापासून तात्पुरता मनाई आदेशाची मागणी आहे.

२. दावा दाखल करण्यामागील थोडक्यात तथ्ये पुढीलप्रमाणे आहेत.

वादी क्रमांक २ हा एक प्रतिष्ठित डॉक्टर आणि प्लास्टिक सर्जन असल्याचा दावा करतो. तो केस प्रत्यारोपणात तज्ञ आहे आणि वादी क्रमांक २ हा वादी क्रमांक १ मर्यादित दायित्व भागीदारी (एलएलपी) चा भागीदार आहे. प्रतिवादी क्रमांक २, ज्याचे नंतर २०२१ मध्ये प्रतिवादी क्रमांक १ नवीनीकरण केले आहे, त्याने डायरेक्ट हेल्थ इम्प्लांटेशन (डीएचआय प्रणाली ) - एक प्रगत केस प्रत्यारोपण प्रणाली, मध्ये नावीन्य आणले आहे आणि आवश्यक उपकरणे आणि उत्पादने विकसित केली आहेत आणि ती डीएचआय प्रणालीशी संबंधित बौद्धिक गुणधर्मांचा मालक देखील आहे. २००९-२०१० मध्ये प्रतिवादी क्रमांक २ ने भारताच्या प्रदेशासाठी मास्टर फ्रँचायझी नियुक्त करण्याचा हेतू दर्शविला. प्रतिवादी क्रमांक ४ आणि ५ हे लक्झरी डे स्पा सेवा पुरवण्याच्या व्यवसाय करतात. ज्यांना वादी एआरएस ग्रुप म्हणून संबोधत आहेत. वादीच्या मते एआरएस ग्रुपने प्रतिवादी क्रमांक २ कडून फ्रँचायझी व्यवसाय मिळवण्यासाठी प्रतिवादी क्रमांक २ शी संपर्क साधला. त्यानुसार, २५ मार्च २०१० रोजी समाविष्ट झालेल्या प्रतिवादी क्रमांक ३ द्वारे २९ जानेवारी २०१० रोजी झालेल्या सामंजस्य कराराद्वारे वादी, प्रतिवादी क्रमांक २ आणि प्रतिवादी क्रमांक ४ यांच्यात एक संयुक्त उपक्रम तयार करण्यात आला.

३. मास्टर फ्रँचायझी करार (२०१०चा एमएफए) २६ मे २०१० रोजी प्रतिवादी क्रमांक २ आणि प्रतिवादी क्रमांक ३ यांच्यात अंमलात आला, ज्यामुळे वादी क्रमांक १

ला भारतात १० वर्षांसाठी डीएचआय फ्रँचायझी व्यवसाय चालवण्यासाठी विशेष परवाना देण्यात आला. डीएचआय फ्रँचायझीच्या अंमलबजावणीसाठी प्रतिवादी क्रमांक ४ आणि वादी यांच्यात २५ जून २०१० रोजी संयुक्त उपक्रम करार झाला. वादी आणि एआरएस ग्रुप यांच्यात मतभेद झाले ज्यामुळे वादी, प्रतिवादी क्रमांक ३ आणि प्रतिवादी क्रमांक ५ यांच्यात १४ ऑक्टोबर २०१७ रोजीचा सेटलमेंट अग्रीमेंट (समझोता करार) झाला आणि त्याअंतर्गत वादींना महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गोवा, ओरिसा, बिहार आणि केंद्रशासित प्रदेश - दमण आणि दीव आणि दादरा नगर हवेली (नियुक्त प्रदेश) प्रदेश देण्यात आले तर उर्वरित भारत प्रतिवादी क्रमांक ३ आणि ४ यांच्याकडे शिल्लक राहिला वादींनी प्रतिवादी क्रमांक ३ मधील त्यांचे भागभांडवल १.८२ कोटी रुपयांच्या मोबदल्यात काढून घेतले. 'सेटलमेंट'च्या अटींनुसार, नियुक्त केलेल्या प्रदेशांमध्ये डीएचआय फ्रेंचायझी व्यवसाय करणाऱ्या वादीसाठी वादी क्रमांक १ आणि प्रतिवादी क्रमांक २ यांच्यात २०१८ चा एमएफए १ मार्च २०१८ रोजी अंमलात आला. वादी क्रमांक १ ने मान्य केले की तो प्रतिवादी क्रमांक २ ला बिल केलेल्या किंवा वसूल केलेल्या एकूण रकमेच्या ७% दराने किंवा दरमहा १८०० युरो यापैकी जे जास्त असेल त्या दराने रॉयल्टी देईल . एमएफए २०१८ च्या अनुषंगाने आणि 'सेटलमेंट अग्रीमेंट, चा परिणाम घडून आणायच्या उद्देशाने २६ मार्च २०१८ रोजीचा प्रदेश नियुक्ती आणि २६ मार्च २०१८ रोजीचा त्याग करार वादी क्रमांक १ आणि प्रतिवादी क्रमांक ३ यांच्यात अंमलात आला ज्या अंतर्गत प्रतिवादी क्रमांक ३ ने नियुक्त केलेल्या प्रदेशांमध्ये वादींना

नियुक्त केलेले (प्रदान केलेले) आणि त्याग केलेले (सोडून दिलेले ) मास्टर फ्रँचायझी अधिकार प्रति महिना २०,००,०००/- रुपये या मोबदल्यात दिले. २६ मार्च २०१८ रोजी नियुक्ती आणि नवीनीकरण करार करण्यात आला ज्या अंतर्गत प्रतिवादी क्रमांक ३ ने वादींच्या नावे नवीन पद्धती सह उप-फ्रँचायझी करार अंतर्गत त्याचे सर्व अधिकार हस्तांतरित केले.

४. त्यानुसार वादीने २०१८ च्या एमएफए अंतर्गत नियुक्त केलेल्या प्रदेशांमध्ये फ्रँचायझी व्यवसाय चालू ठेवला परंतु त्यानुसार, एआरएस ग्रुपने वादींच्या व्यवसायात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली आणि वादींना त्यांचा व्यवसाय विकण्यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न केला. १ जानेवारी २०२१ रोजी एक नवीनीकरण करार अंमलात आणला गेला ज्याद्वारे २०१८ चा एमएफएचे नवीनीकरण करण्यात आले आणि प्रतिवादी क्रमांक १ च्या बाजूने हस्तांतरित करण्यात आला. वादीने प्रतिवादी क्रमांक ३ सह संपूर्ण फ्रँचायझी व्यवसायाची शक्यता शोधण्याचा आणि वरील पार्श्वभूमीवर पक्षांमधील फ्रँचायझी शोधण्याचा निर्णय घेतला. वादीला १७ जानेवारी २०२५ रोजी प्रतिवादी क्रमांक १ कडून पत्र मिळाले ज्यामध्ये त्याला कळवले गेले की २० नोव्हेंबर २०२४ रोजीचा करार प्रतिवादी क्रमांक ३ सह अंमलात आणण्यात आला ज्या अंतर्गत सर्व डीएचआय बौद्धिक मालमत्ता प्रदेश हे प्रतिवादी क्रमांक ३ ची नियुक्ती (हस्तांतरण) होती. वादीच्या मते, हि नियुक्ती बेकायदेशीर आहे आणि ते २०१८ च्या एमएफए चे उल्लंघन करते. त्यानुसार वादीने १ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या ईमेलद्वारे

नियुक्तीचा निषेध केला. दरम्यान, वादींद्वारे प्रतिवादी क्रमांक ३ ला फ्रँचायझी व्यवसायाच्या विक्रीसाठी वाटाघाटी सुरू झाल्या आणि पक्षांनी अटींची देवाणघेवाण केली. २९ एप्रिल २०२५ रोजी प्रतिवादी क्रमांक ४ ने, वादींनी मुद्दामहून कमी बिलिंग केल्याचा आरोप केला. तथापि, पक्षांमधील वाटाघाटी सुरूच राहिल्या.

५. वरील पार्श्वभूमीवर, प्रतिवादी क्रमांक १ ने १४ ऑगस्ट २०२५ रोजी कमी रॉयल्टी च्या उद्देशाने वादींनी जाणूनबुजून कमी बिलिंग केल्याचा आरोप करत २०१८ चा एमएफए समाप्त करत सूचना बजावली आणि गेल्या तीन वर्षात कमी व्यवसाय केल्यामुळे उद्भवलेल्या १,८०,३८,४३३/- रुपयांची रॉयल्टी देण्याचे आवाहन केले. वादींनी समाप्ती करारातील मजकुर नाकारत २२ ऑगस्ट २०२५ रोजीचे वकिलांचे उत्तर पाठवले . त्यानंतर पक्षांच्या वकिलांमध्ये पत्रव्यवहार झाला.

६. त्यानुसार वादींनी १४ ऑगस्ट २०२५ रोजीच्या समाप्ती सूचनेला आव्हान देत प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे आणि २०१८ चा एमएफए वैध आहे आणि प्रतिवादींवर तो बंधनकारक आहे अशी घोषणा करण्याची मागणी केली आहे. वादींनी, प्रतिवादी क्रमांक ३ ते ५ ला नियुक्त केलेल्या क्षेत्रात डीएचआय बौद्धिक संपदा, डीएचआय ज्ञान, डीएचआय चिन्हे, उत्पादने किंवा सेवा वापरण्यापासून कायमस्वरूपी मनाई करण्याची मागणी केली आहे. वादींनी २०१८ च्या एमएफए च्या विशिष्ट कामगिरीसाठी पर्यायी स्वरूपात ५० कोटी रुपयांच्या नुकसानीची मागणी केली आहे. वादींना दाव्यात इतर विविध संबंधित दिलासे देखील आहेत. त्यांच्या दाव्यात वादींनी

न्यायनिर्णयाच्या सुरुवातीच्या परिच्छेदात दर्शविल्याप्रमाणे प्रतिवादींविरुद्ध तात्पुरता मनाई आदेश पारीत करण्याची मागणी करणारा प्रस्तुतचा अंतरिम अर्ज दाखल केला आहे.

७. अंतरिम अर्जातील युक्तिवाद पूर्ण झाल्यामुळे, तो सुनावणी आणि निकाली काढण्यासाठी घेतला जात आहे.

८. वादींच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान वरिष्ठ वकील श्री. कामत यांनी अंतरिम अर्जाच्या समर्थनार्थ पुढील युक्तिवाद केले :-

ए ) १४ ऑक्टोबर २०१७ च्या समझोता करारानुसार आणि २०१८ च्या एमएफए नुसार वादींना नियुक्त केलेल्या प्रदेशांमध्ये डीएचआय फ्रँचायझी व्यवसाय सुरू ठेवण्याचा पूर्णपणे अधिकार आहे.

बी ) प्रतिवादी क्रमांक २ ने प्रतिवादी क्रमांक ३ च्या बाजूने अंमलात आणलेला २० नोव्हेंबर २०२४ रोजीचा आयपी नियुक्ती करार आणि १२ मार्च २०२५ रोजीचा आयपी नियुक्ती करार, २०१८ च्या एमएफए चे नकारात्मक कलम ९ आणि १७ च्या बरोबरीचे आहेत, ज्यामध्ये प्रतिवादी क्रमांक १/२ ला, मालकी किंवा व्यवस्थापनात बदल करण्यापूर्वी किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या गुजरात बॉटलिंग कंपनी लिमिटेड आणि इतर विरुद्ध कोका कोला आणि इतर [1], प्रकरणातील न्यायनिर्णयावर भिस्त ठेवून तृतीय पक्षांना एफएमए कायद्याअंतर्गत

---

1 १९९५ (५) एससीसी ५४५

कोणतेही अधिकार किंवा दायित्वे सोपवण्यापूर्वी, वादींची संमती घेणे बंधनकारक होते. त्यांनी असा युक्तिवाद केला की करारातील अशा नकारात्मक अटी मनाई आदेशाद्वारे लागू केल्या जाऊ शकतात.

सी ) त्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ ला १४ ऑगस्ट २०२५ रोजीची समाप्तीची सूचना जारी करण्याचा अधिकार नव्हता. प्रतिवादी क्रमांक १ ने १७ जानेवारी २०२५ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिवादी क्रमांक ३ ला प्रतिवादी क्रमांक १ च्या जागी येण्याची सूचना दिली होती आणि म्हणूनच प्रतिवादी क्रमांक १ ने समाप्तीची सूचना जारी केली नसती.

डी ) समाप्तीची सूचना अन्यथा बेकायदेशीर आहे कारण २०१८ च्या एमएफए चे कलम १० मध्ये ३० दिवसांची कायदेशीर सूचना जारी करण्याचे नमूद आहे जी कधीही वादीला देण्यात आली नव्हती.

इ ) २९ एप्रिल २०२५ रोजीचा ईमेल ज्यामध्ये व्यवसाय कमी असल्याचे आणि 'विक्रीच्या अहवालात चूक झाल्याचा आरोप आहे', तो एमएफएच्या कलम १० च्या अर्थानुसार कायदेशीर सूचना बनवत नाही. श्री. अग्रवाल यांनी प्रतिवादी क्रमांक ३ ने संचालक म्हणून दाखल केलेल्या युक्तिवादांना दुजोरा दिला आहे आणि म्हणूनच असा युक्तिवाद करता येत नाही की २९ एप्रिल २०२५ रोजीचा ईमेल प्रतिवादी क्रमांक १ ने केवळ श्री. अग्रवाल यांनी डीएचआयचा ईमेल आयडी वापरला म्हणून जारी केला होता.

एफ) अन्यथा २९ एप्रिल २०२५ रोजीचा ईमेल हा एमएफए मध्ये नमूद केल्याप्रमाणे कायदेशीर सूचना म्हणून वापरला जात नाही कारण त्याने ३० दिवसांच्या आत कथित त्रुटी दूर करण्याची संधी दिली नाही. या समर्थनार्थ, त्यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ लिमिटेड विरुद्ध प्लस बीकेएसपी टोल लिमिटेड [2] या प्रकरणातील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली.

जी) २९ एप्रिल २०२५ रोजी ईमेल जारी केल्यानंतर प्रतिवादींनी वाटाघाटी केल्याचे वर्तन स्पष्टपणे दर्शवेल की एमएफए च्या कलम १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे हा ईमेल समाप्तीपूर्वी कायदेशीर सूचना नव्हती.

एच) प्रतिवादींमध्ये सामील झालेल्या वादीच्या असंतुष्ट माजी कर्मचाऱ्याने उघड केलेल्या व्हाट्सअप संदेशांवर आधारित कमी व्यवसाय विक्रीचा अहवाल देण्याचा खोटा आरोप केला आहे. वादीने कमी विक्रीचे कोणतेही अहवाल दिलेले नाहीत. व्हाट्सअप संदेश रुग्णांना दिलेले/सहमत असलेले संपूर्ण पॅकेजेस दर्शवतात आणि केवळ डीएचआय संबंधित कामच दाखवत नाहीत. २०१८ च्या एमएफए च्या कलम ५(एच) नुसार, "व्यवसाय" या संज्ञेच्या व्याख्येसह वाचले जाते , वादींना नियुक्त प्रदेशांमध्ये व्यवसाय करण्यासाठी आणि शुल्क वाटाघाटी करण्यासाठी क्लिनिक निवडणे आणि उघडणेच्या बाबतीत विवेकाधिकार आहेत. अशा प्रकारे देऊ केलेल्या पॅकेजमध्ये उत्तरा 'च्या परिच्छेद २४ मध्ये दाखवल्याप्रमाणे अनेक

2 २०२१ एससीसी ऑनलाईन बॉम ६०७

इतर ‘ बिगर-डीएचआय संबंधित सेवा’ समाविष्ट होत्या. प्रतिवादी क्रमांक १ ने ‘वादींच्या खात्यांशी संबंधित प्रलंबित फॉरेन्सिक ऑडिट’चा उल्लेख केला आहे, म्हणजेच अहवालाअंतर्गत कोणताही ठोस निष्कर्ष काढता येत नाही.

आय ) सर्व नियुक्त प्रदेशांशी संबंधित सर्व दाव्यांवर आणि ‘संभाव्य विक्री’ वर महसूल तोटा म्हणून दावा केलेली २५ कोटी रुपयांची रक्कम आणि तीच रक्कम वादींनी भूतकाळात काय कमावले असेल याचे सूचक नाही.

९. वरील व्यापक युक्तिवादांवर, श्री. कामत यांनी अंतरिम अर्ज त्यामध्ये केलेल्या प्रार्थनांच्या अटींमध्ये कायम करण्यासाठी विनंती केली.

१०. श्री. डॉक्टर, प्रतिवादी क्रमांक १ च्या वतीने उपस्थित विद्वान वरिष्ठ वकील यांनी, पुढीलप्रमाणे युक्तिवाद करून अंतरिम अर्जास विरोध केला.

ए ) कि अनेक प्रतिवादींविरुद्ध कारवाईच्या कारणांची चुकीची माहिती देणेसाठी दावा वाईट आहे. दावा २०१८ च्या एमएफएच्या समाप्तीला आव्हान देतो आणि त्याची विशिष्ट कामगिरी शोधतो . तथापि, वादीने २० नोव्हेंबर २०२४ रोजी डेक्सपो इंटेलेक्चुअल प्रॉपर्टीज सर्व्हिसेस लिमिटेड (डेक्सपो) नावाच्या कंपनी आणि प्रतिवादी क्रमांक ३ यांच्यात झालेल्या करारालाही आव्हान दिले आहे ज्याद्वारे डेक्सपोने प्रतिवादी क्रमांक ३ ला डीएचआय आयपी हस्तांतरित केले आहे. ही विभक्त आणि कारवाईची असंबंधित कारणे एकाच दाव्यात एकत्रित करता येणार नाहीत. २०१८ च्या एमएफए अंतर्गत लवाद करारातून सुटका मिळविण्यासाठी त्यांना जाणूनबुजून एकत्रितपणे

करण्यात आले आहे.

बी ) प्रतिवादी क्रमांक १ ला रॉयल्टी न देण्याच्या उद्देशाने वादींनी जाणूनबुजून विक्रीचा चुकीचा अहवाल दिल्याबद्दल १४ ऑगस्ट २०२५ च्या सूचनेद्वारे २०१८ चा एमएफए समाप्त करण्यात येत आहे. त्या सूचनेत प्रतिवादी क्रमांक १ ला नोंदवलेल्या विक्रीच्या विरूद्ध वादी क्रमांक १ च्या मुंबई क्लिनिकच्या प्रत्यक्ष विक्रीची आकडेवारी आहे.

सी) वादींनी कमी विक्रीचा अहवाल दिल्याचे प्रतिवादींनी सादर केलेल्या व्हॉट्सअॅप चॅट आणि उत्तर प्रतिज्ञापत्रांवरून दिसून येते.

डी ) वादींनी व्हॉट्सअॅप चॅटच्या खरेपणावर वाद घातला नाही आणि त्यांनी हे तथ्य मान्य केले कि ते मुंबई क्लिनिकमध्ये कामकाजाच्या सोयीसाठी वादी क्रमांक २ ने तयार केलेल्या व्हॉट्सअॅप ग्रुपशी संबंधित आहेत .

ई) व्हॉट्सअॅप चार्ट आणि त्याच्या बिलामध्ये नमूद केलेल्या आकडेवारींमधील तफावत स्पष्ट करण्याचा वादीचा प्रयत्न अस्वीकार्य आहे. त्यांनी रुग्णांना डीएचआयशी संबंधित नसलेल्या सेवा देण्यासारख्या निराधार सबबी मांडल्या आहेत ज्या व्हॉट्सअॅप संदेशाच्या स्पष्ट भाषेद्वारे खोट्या ठरतात. वादींच्या उत्तरात विविध रुग्णांना बिल जारी न करणे किंवा रोख रक्कम स्वीकारणे यासारख्या सबबी मांडल्यामुळे विक्री कमी झाल्याची कबुली आहे.

एफ) वादींनी स्वतः व्यवसायाच्या नुकसानीसाठी २५ कोटी रुपयांच्या नुकसानीचा दावा केला आहे हे डीएचआय फ्रँचायझी व्यवसायातून मिळणाऱ्या संभाव्य कमाईचे सूचक

आहे. हि आकडेवारी २०२२-२३ ते २०२४-२५ दरम्यान वादींनी नोंदवलेल्या विक्रीच्या आकडेवारीपेक्षा खूपच जास्त आहे.

जी)फसव्या वर्तनाशी संबंधित प्रकरणात कोणतीही कायदेशीर सूचना जारी करण्याची आवश्यकता नाही. या समर्थनार्थ त्यांनी भारत पेट्रोलियम विरुद्ध मेसर्स जेठानंद ठाकुरदास कराचीवाला आणि इतर [3] या प्रकरणातील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली . जेव्हा करार खंडन केला जातो तेव्हा कोणतीही कायदेशीर सूचना आवश्यक नसते आणि या समर्थनार्थ त्यांनी नवयुगा मचिलीपट्टनम पोर्ट लिमिटेड विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य आणि इतर [4]२०२२ ऑनलाइन २१२५. ४ या प्रकरणातील आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली .

एच) अन्यथा देखील २९ एप्रिल २०२५ रोजी वादींना कमी विक्रीचा अहवाल दिल्याचा आरोप करत कायदेशीर सूचना जारी करण्यात आली होती ज्याला वादींनी उत्तर दिले नाही.

आय ) कोणताही पूर्वग्रह न ठेवता त्यांनी असा युक्तिवाद केला की कायदेशीर सूचना जारी न केल्याने नुकसानभरपाईचा दावा केला जाईल आणि वादींना अंतरिम मनाई आदेशाद्वारे २०१८ चा एमएफए करण्यास भाग पाडले जाऊ शकत नाही.

जे) २०१८ च्या एमएफएच्या अटींनुसार २० नोव्हेंबर २०२४ च्या आयपी कराराला

---

3 १९९८ एससीसी ऑनलाईन बॉम ३२०

4 २०२२ एससीसी ऑनलाईन एपी २१२५

वादींचे आव्हान चुकीचे आहे कारण २०१८ च्या एमएफए चे कलम ९ हे फ्रँचायझरच्या संबंधात नियंत्रण बदलण्याशी संबंधित आहे तर आयपी करार दुसऱ्या कंपनीच्या (डेक्सपो) मालकीच्या आयपी मालमत्तेच्या हस्तांतरणाशी संबंधित आहे.

११. वरील युक्तिवादावर, श्री. डॉक्टर यांनी अंतरिम अर्ज फेटाळण्याची प्रार्थना केली.

१२. प्रतिवादी क्रमांक ३ च्या वतीने उपस्थित असलेले विद्वान वकील श्री. तांबोळी यांनी अंतरिम अर्जाला विरोध केला आणि श्री. डॉक्टर यांच्या युक्तिवादाव्यतिरिक्त, पुढीलप्रमाणे युक्तिवाद केला :-

ए ) विशिष्ठ सहाय्य अधिनियम , १९६३ च्या कलम १६ च्या तरतुदींनुसार २०१८ चे एमएफए च्या विशिष्ट कामगिरीला वादींच्या बाजूने मंजुरी देता येणार नाही कारण वादींनी कराराची फसवणूक केली आहे तसेच कराराच्या विरुद्ध जाणूनबुजून कृती केली आहे. व्हॉट्सअॅप चॅट्सच्या बिलाच्या तुलनेवरून उघड झालेले वादीचे वर्तन हे कराराची फसवणूक आहे, ज्यामुळे वादींना विशिष्ट कामगिरी मिळविण्यापासून अपात्र ठरवले जाते.

बी ) वादींनी उत्तरात व्हॉट्सअॅप चॅटच्या तुलनेत बिलांमधील विसंगती स्पष्ट केल्या आहेत आणि त्या विचारपूर्वक आणि अस्वीकार्य आहेत कारण गैर -डीएचआय सेवांमध्ये समाविष्ट असलेल्या घटनांमध्ये व्हॉट्सअॅप चॅटचा वेगळा संदर्भ आहे.

सी ) वादींना २९ एप्रिल २०२५ रोजी विसंगतींबद्दल लक्षात आणून देण्यात आले होते .

डी ) समाप्तीची सूचना योग्य अधिकाराने जारी करण्यात आली आहे कारण प्रतिवादी क्रमांक १ ने १२ मार्च २०२५ रोजी प्रतिवादी क्रमांक ३ च्या नावे पॉवर ऑफ अ‍ॅटर्नी केली आहे जी २९ एप्रिल २०२५ रोजी सूचना जारी करण्यास अधिकृत आहे.

इ ) आयपी नियुक्ती आणि २० नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या आयपी नियुक्ती करारास आक्षेप आणि आव्हान आणि कपिलाबेन आणि इतर विरुद्ध अशोक कुमार जयंतीलाल शेठ, पीओए गोपालभाई मधुसूदन पटेल मार्फत आणि इतर [5], या प्रकरणातील स्थापित कायद्याच्या दृष्टीने , फ्रँच्याइजने आक्षेपित समाप्ती सूचनेद्वारे योग्यरित्या २०१८ चा एमएफए रद्दबातल केला आहे.

एफ ) ते अटी पत्रक पक्षांच्या हक्कांना बाधा न आणता जारी करण्यात आले होते आणि त्यामुळे सतत वाटाघाटी करणे हे प्रतिवादीचे सूचना माफी देण्यासारखे नाही. वरील सादरीकरणावर, श्री. तांबोळी यांनी अंतरिम अर्ज फेटाळण्याची विनंती केली .

१३. पक्षांचे प्रतिस्पर्धी वाद आता माझ्या विचारार्थ येतात.

१४. वादी हे मुळात प्रतिवादी क्रमांक १ ने २०१८ चा एमएफए रद्दबातल केल्याने नाराज आहेत, ज्याअंतर्गत त्यांना नियुक्त प्रदेशांमध्ये त्यांच्या क्लिनिकद्वारे केस पुनर्संचयित करणे आणि संबंधित सेवा प्रदान करण्याचा डीएचआय फ्रँचायझी व्यवसाय चालविण्यासाठी प्रतिवादी क्रमांक १ कडून १० वर्षांसाठी विशेष परवाना मिळाला आहे. २०१० चा पूर्वीचा एमएफए प्रतिवादी क्रमांक ३ च्या बाजूने अंमलात आणण्यात आला

5 २०२०(२०) एससीसी ६४८

होता जो वादी आणि प्रतिवादी क्रमांक ३ आणि ४ यांच्यात संयुक्त उपक्रम होता. वादी आणि एआरएस ग्रुपमधील वादांमुळे, ते १४ ऑक्टोबर २०१७ रोजी झालेल्या तडजोड कराराची अंमलबजावणी करून वेगळे झाले आहेत ज्या अंतर्गत वादींनी १.८२ कोटी रुपयांच्या मोबदल्यावर प्रतिवादी क्रमांक ३-कंपनीमधील त्यांची भागभांडवल मालकी सोडली आहे आणि त्या बदल्यात त्यांना महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गोवा, ओरिसा, बिहार, दमण दीव आणि दादरा - नगर हवेली या नियुक्त प्रदेशांमध्ये प्रतिवादी क्रमांक १ आणि २ चा डीएचआय फ्रँचायझी व्यवसाय करण्याचा विशेष अधिकार मिळाला आहे. उर्वरित भारत प्रतिवादी क्रमांक ३ आणि ४ यांच्याकडेच राहिला आहे. वादी आणि प्रतिवादी क्रमांक ३ आणि ४ यांच्यातील तडजोडीमुळे, प्रतिवादी क्रमांक २ ने १ मार्च २०१८ रोजी वादींच्या नावे नियुक्त केलेल्या प्रदेशांच्या संदर्भात १० वर्षांच्या कालावधीसाठी नवीन मास्टर फ्रँचायझी अंमलात आणली . २०१८ च्या एमएफए अंतर्गत, प्रतिवादी क्रमांक २ ने वादीच्या बाजूने त्यांच्या क्लिनिकद्वारे अधिक अधिकार देऊन आणि नियुक्त केलेल्या प्रदेशांमध्ये उप -फ्रँचायझी करारांच्या अंमलबजावणीद्वारे व्यवसायाला प्रोत्साहन आणि विकास करण्यासाठी विविध क्लिनिक ओळखून आणि त्यांना सहभागी करून घेण्यासाठी १० वर्षांच्या कालावधीसाठी विशेष परवाना दिला. करारानुसार, प्रतिवादी क्रमांक २ ने वादींना प्रशिक्षण, तज्ञता, सल्लामसलत, विपणन, डीएचआय ज्ञान, डीएचआय चिन्हे, परवाना, डीएचआय प्रमाणित कागदपत्रांची तरतूद, संदर्भ इत्यादी प्रदान करण्यास सहमती दर्शविली.

कराराअंतर्गत, प्रतिवादी क्रमांक २ ला प्रदेशातील सर्व क्लिनिकमधून व्यवसायाकडून बिल केलेल्या आणि वसूल केलेल्या एकूण रकमेच्या ७% रक्कम किंवा दरमहा १८०० युरो, जे जास्त असेल ते रॉयल्टी मिळण्याचा हक्क आहे. एमएफएचे कलम-६.१ रॉयल्टीशी संबंधित आहे आणि ते पुढीलप्रमाणे आहे:

> ६.१. रॉयल्टी: फ्रँचायझरला प्रदेशातील सर्व क्लिनिकद्वारे व्यवसायाकडून बिल केलेल्या आणि वसूल केलेल्या एकूण रकमेच्या ७% रॉयल्टी किंवा दरमहा युरो एक हजार आठशे (१८००€) यापैकी जे जास्त असेल ते मिळण्याचा हक्क असेल. फ्रँचायझीने फ्रँचायझरला लागू असलेल्या प्रदेशाच्या लागू कायद्यांचे पालन करण्याच्या अधीन राहून दिले पाहिजे.
>
> रॉयल्टीचा असा भरणा प्रत्येक तिमाहीच्या सुरुवातीला तिमाहीने केला जाईल आणि जर फरक असेल तर तो प्रत्येक तिमाहीच्या शेवटी बिल केले जाईल. शिवाय, वर नमूद केलेल्या रॉयल्टी भरण्याचा विचार करून, फ्रँचायझर फ्रँचायझीला डीएचआय /डीएचआय चिन्हे च्या संदर्भात नवीन विकास (जर असेल तर) प्रदान करण्यास सहमत आहे जोपर्यंत फ्रँचायझी कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय अस्तित्वात आहे तोपर्यंत.

१५. २०१८ च्या एमएफए च्या कलम-१.१ मध्ये 'व्यवसाय' हा शब्दाचा उल्लेख असल्याने, कलम-१.१ अंतर्गत “व्यवसाय” या शब्दाची व्याख्या उद्धृत करणे योग्य ठरेल जी, पुढीलप्रमाणे आहे :-

"व्यवसाय" म्हणजे केस पुनर्संचयित करण्याचा व्यवसाय विशेषतः विकसित उपकरणे आणि उत्पादने वापरून सेवा प्रदान करणे ;

१६. २०१८ च्या एमएफए च्या अंमलबजावणीसह, वादी क्रमांक १ आणि २ ने २६ मार्च २०१८ रोजीच्या प्रदेश नियुक्ती करार आणि त्याग करार देखील अंमलात आणला आहे ज्या अंतर्गत प्रतिवादी क्रमांक ३ ने २० लाख रुपयांच्या मोबदल्यात वादीच्या नावे डीएचआय फ्रँचायझी अधिकार नियुक्त केले आणि सोडून दिले. त्याचप्रमाणे, वादी-प्रतिवादी क्रमांक ३ आणि एक कॉस्मेटिक प्लास्टिक सर्जरी आणि लेसर सुपर स्पेशालिटीज (सीपीएसएलएसएस ) यांच्यात एक उप -फ्रँचायझी नि नवीनीकरण करार अंमलात आणला गेला आहे ज्या अंतर्गत वादी क्रमांक १ ने सीपीएसएलएसएस साठी उप -फ्रँचायझी म्हणून प्रतिवादी क्रमांक ३ च्या जागी पाऊल ठेवले. त्याचप्रमाणे, २३ मार्च २०१८ रोजीचा नियुक्ती आणि नवीनीकरण करार अंमलात आणला गेला ज्या अंतर्गत वादी क्रमांक १ ला नवीन पद्धतीच्या उप -फ्रँचायझीच्या संदर्भात प्रतिवादी क्रमांक ३ चे सर्व अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

१७. अशा प्रकारे वादी आणि प्रतिवादी क्रमांक ३ आणि ४ ने केस प्रत्यारोपण सेवा आणि इतर संबंधित सेवांच्या तरतूदीशी संबंधित त्यांचे व्यवसाय वेगळे केले. दरम्यान, प्रतिवादी क्रमांक १ ने प्रतिवादी क्रमांक २ च्या जागी पाऊल ठेवले आहे. आणि त्यानुसार २०१८ चा एमएफए, १ जानेवारी २०२१ रोजीच्या नवीनीकरण कराराद्वारे प्रतिवादी क्रमांक १ च्या नावे नवीनीकरण आणि हस्तांतरित करण्यात आला आहे . अश्याप्रकारे

२०१८ चा एमएफए वादी आणि प्रतिवादी क्रमांक १ यांच्यात अशा प्रकारे चालू राहिला.

१८. वादींच्या मते व्यवसाय वेगळे असूनही, एआरएस ग्रुपला नियुक्त केलेल्या प्रदेशांमध्ये वादींच्या व्यवसायात हस्तक्षेप करत राहिला आणि नियुक्त केलेल्या प्रदेशांमधील फ्रँचायझी व्यवसाय एआरएस ग्रुपला विकण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणत होता. या पार्श्वभूमीवर, प्रतिवादी क्रमांक ३ ने २० नोव्हेंबर २०२४ रोजीच्या भारतीय प्रदेशाच्या संदर्भात डेक्सपोकडून डीएचआय ब्रँडशी संबंधित बौद्धिक संपदा अधिकार मिळवले. अशा प्रकारे वादी(प्रतिवादी क्रमांक ३ हा एआरएस ग्रुपचा भाग आहे) च्या व्यावसायिक प्रतिस्पर्ध्याने प्रतिवादी क्रमांक १ च्या डीएचआय ब्रँडच्या संबंधात आयपी अधिकार मिळवले आहेत.वादीच्या मते, हा करार २० नोव्हेंबर २०२४ रोजी प्रतिवादी क्रमांक ३ यांच्यात झाला आणि तो डेक्सपो २०१८ च्या एमएफएच्या कलम-९ आणि १७ च्या बरोबर आहे. वादपत्राच्या प्रार्थनेच्या कलम (जी) मध्ये, वादींनी २० नोव्हेंबर २०२४ च्या आयपी कराराला आव्हान दिले आहे. तथापि, सदर करार डेक्सपो आणि प्रतिवादी क्रमांक ३ यांच्यात अंमलात आला आहे आणि डेक्सपो हा दाव्याचा पक्ष नाही आणि या टप्प्यावर हे प्रश्नार्थी आहे की डेक्सपोने दाव्यात अंमलबजावणी न केल्यास २० नोव्हेंबर २०२४ च्या आयपी नियुक्ती कराराच्या वैधतेचा मुद्दा निश्चित केला जाऊ शकतो का ? वादींनी २० नोव्हेंबर २०११ च्या आयपी नियुक्ती कराराच्या संदर्भात कोणताही तात्पुरता मनाई आदेश मागितला नाही. तथापि, श्री. कामत यांनी असा युक्तिवाद केला आहे की डीएचआय ब्रँडमध्ये प्रतिवादी क्रमांक ३ द्वारे आयपी अधिकारांचे संपादन हे एआरएस

ग्रुपने क्षुल्लक सबबी देऊन २०१८ चा एमएफए संपुष्टात आणण्याचे प्रमुख कारण आहे. याच कारणामुळे २० नोव्हेंबर २०२४ रोजीच्या आयपी नियुक्ती करारालाही वादीने दाव्यात आव्हान दिले आहे. वादींचा असा दावा आहे की आयपी नियुक्ती करार हा एमएफएच्या कलम-९ आणि १७ चे उल्लंघन करतो, वरील कलमे खाली पुन्हा सादर केली आहेत:

९. नियंत्रण बदल:

(ए ) फ्रँचायझरला मालकी किंवा व्यवस्थापनात बदल झाल्यास, फ्रँचायझर खात्री करेल की नवीन व्यवस्थापन या कराराच्या अटींचे फ्रँचायझरचे पालन करत आहे याची खात्री करत राहील,किंवा (२) या कराराच्या अंतर्गत त्यांचे अधिकार आणि दायित्वे कोणत्याही तृतीय व्यक्ती हस्तांतरित करणाऱ्याला हस्तांतरित किंवा नियुक्त करू इच्छित असेल, तर फ्रँचायझरला (प्रस्थापित व्यवसायी) फ्रँचायझीची पूर्व संमती घ्यावी.

१७. नियुक्ती नसलेले :

कोणताही पक्ष या कराराच्या अंतर्गत त्यांचे सर्व किंवा कोणतेही अधिकार आणि/ किंवा दायित्वे नियुक्त, हस्तांतरित, शुल्क आकारण्याचा किंवा अन्यथा व्यवहार करण्याचा अभिप्राय देणार नाही किंवा त्यात कोणताही अधिकार किंवा हितसंबंध प्रदान करणार नाही, घोषित करणार नाही, निर्माण करणार नाही किंवा विल्हेवाट लावणार नाही, किंवा या कराराच्या अंतर्गत त्यांच्या कोणत्याही दायित्वांच्या

कामगिरीचे उप करार संपूर्ण किंवा अंशतः (अन्यथा या कराराच्या अटींनुसार आणि त्यानुसार) करार) दुसऱ्या पक्षाच्या लेखी संमतीशिवाय करणार नाही.

१९. कलम ९ आणि १७ चे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास असे दिसून येईल कि प्रतिवादी क्रमांक १/२ ची मालकी बदल्यास ( ज्या प्रकरणात नवीन व्यवस्थापनाने २०१८ च्या एमएफएचे फ्रँचायझरने पालन केले आहे याची खात्री करणे सुरु ठेवावे) किंवा फ्रँचायझर २०१८ च्या एमएफए अंतर्गत त्यांचे अधिकार आणि दायित्वे तिसऱ्या व्यक्तीला हस्तांतरित किंवा नियुक्त करू इच्छित असल्यास, वादींची संमती आवश्यक होती २०१८ च्या एमएफए च्या कलम १७ विचारात घेता , दुसऱ्या पक्षाच्या लेखी संमतीशिवाय करारा अंतर्गत अधिकार किंवा दायित्वे नियुक्त करण्यावर बंदी घातली आहे. २० नोव्हेंबर २०२४ रोजीच्या आयपी नियुक्ती कराराद्वारे जे केले जाते ते म्हणजे प्रतिवादी क्रमांक ३ च्या बाजूने डेक्सपोने डीएचआय आयपी अधिकारांचे हस्तांतरण करणे. आयपी नियुक्ती करार प्रथमदर्शनी प्रतिवादी क्रमांक १/२ चे अधिकार किंवा दायित्वे प्रतिवादी क्रमांक ३ च्या बाजूने हस्तांतरित करण्याचा प्रयत्न करत नाही. खरं तर, प्रतिवादी क्रमांक १/२ द्वारे सदर कराराची अंमलबजावणी देखील केली जात नाही. म्हणून, २०१८ चा एमएफए संपुष्टात आणण्याचे प्रमुख कारण प्रतिवादी क्रमांक ३ कडून डीएचआय व्यवसायाचे अधिग्रहण आहे असा वादीचा युक्तिवाद प्रथमदर्शनी स्वीकारला जाऊ शकत नाही. म्हणून, गुजरात बॉटलिंग कंपनी लिमिटेड ( उपरोल्लेखित ) प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाने करारात नकारात्मक अटी लागू करण्यासाठी मनाई आदेशाच्या मुद्द्याशी संबंधित निकालाच्या गुणोत्तरावर चर्चा करणे

आवश्यक नाही.

२०. १४ ऑगस्ट २०२५ च्या समाप्ती सूचनेच्या गुणवत्तेचा विचार करताना, कलम -७, ८, ९, ९ए , ९बी , ९सी , ११,१० आणि १२ पुढीलप्रमाणे आहेत :-

७. २८ एप्रिल २०२५ रोजी, आम्ही जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च २०२५ साठी तुम्ही आम्हाला पाठवलेले विक्री अहवाल, त्या महिन्यांसाठी तुम्ही देय असलेली रॉयल्टी मोजणीसाठी एसएचएसपीएलला पाठवले तथापि, एसएचएसपीएलला असे आढळले की तुम्ही आम्हाला नोंदवलेली विक्री हि तुम्ही एसएचएसपीएलला योग्य मोबदला निश्चित करण्यासाठी दिलेल्या विक्री संख्येपेक्षा लक्षणीयरीत्या कमी होती. एसएचएसपीएलने, आम्हाला दिलेल्या प्रतीखाली, २९ एप्रिल २०२५ रोजी तुम्हाला एक ईमेल लिहिला, ज्यामध्ये तुम्ही रॉयल्टी मोजणीसाठी नोंदवलेल्या विक्रीतील या प्रचंड विसंगतीबद्दल आणि तुम्ही एसएचएसपीएलला दिलेल्या विक्री संख्येबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली. तुम्हाला या विसंगती स्पष्ट करण्याची संधी होती परंतु तुम्ही नोंदवलेल्या अशा प्रचंड प्रमाणात दडपलेल्या विक्रीबद्दल कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही. तुमचे चुकीचे सादरीकरण, त्यानंतर प्रतिसाद देण्यात किंवा कोणतेही स्पष्टीकरण देण्यात अपयश, हे अनुक्रमे एमएफए च्या कलम १०. २ अंतर्गत सतत कसूरची घटना आणि या उल्लंघनाचे निराकरण करण्यात अपयश आहे. तुमचे वर्तन दर्शविते की एमएफए अंतर्गत तुमच्या जबाबदाऱ्यांचे पालन

करण्याचा तुमचा कोणताही हेतू नाही. शिवाय, एमएफए च्या कलम ६ नुसार रॉयल्टी भरण्यात तुम्ही अपयशी ठरला आहात, ज्यात जानेवारी २०२५ पासून आजपर्यंत रॉयल्टी भरण्यात तुम्ही सतत अपयशी ठरला आहात आणि एप्रिल २०२५ पासून विक्रीची आकडेवारी नोंदवली आहे , हे एमएफए च्या मुळाशी जाते आणि हे एक महत्त्वाचे आणि मूलभूत उल्लंघन आहे.

८. यामुळे आम्हाला गेल्या काही वर्षात तुम्ही नोंदवलेल्या विक्रीची तपासणी करावी लागली. आमच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीशी आणि आम्ही एसएचएसपीएलला विनंती केलेल्या माहितीशी त्याचा संबंध जोडला.

९. आम्हाला आता असे आढळून आले आहे की ऑक्टोबर २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत, तुम्ही मुंबई क्लिनिकमध्ये रॉयल्टी भरण्याच्या उद्देशाने प्रत्यक्ष विक्रीच्या फक्त 22% विक्री नोंदवली आहे. या कालावधीत मुंबईतील एका क्लिनिकमधून प्रत्यक्ष विक्री रुपये ३०,०१६,९३३/- होती, तर तुम्ही जाणूनबुजून आणि फसवणूकीने विक्रीचे चुकीचे वर्णन केले आहे आणि मुंबई क्लिनिकमधून रुपये ६,६३४,०६८/- विक्री नोंदवली आहे. तपशील खाली दिले आहेत.

| महिना | मुंबई | फ्रँचायझरला | कमी- | % म्हणून |
|---|---|---|---|---|

| | क्लिनिकची प्रत्यक्ष विक्री | नोंदवलेली मुंबई विक्री | नोंदवलेली विक्री | नोंदवलेली विक्री |
|---|---|---|---|---|
| ऑक्टोबर २०२४ | ३०,७९,३२६ | १२,९५,००० | -१७,८४,३२६ | ४२% |
| नोव्हेंबर २०२४ | ४०,८३,११५ | ८,९५,००० | -३१,८८,११५ | २२ % |
| डिसेंबर २०२४ | ७४,७१,१०१ | १३,९०,००० | -६०,८१,१०१ | १९% |
| जानेवारी २०२५ | ४६,०५,०८६ | ९,७७,३७३ | -३६,२७,७१३ | २१% |
| फेब्रुवारी २०२५ | ४१,४०,१६९ | ८,४६,६९५ | -३२,९३,४७४ | २०% |
| मार्च २०२५ | ६६,३८ ,१३६ | १२,३०,000 | -५४,०८,१३६ | १९% |
| एकूण | ३,00,१६,९३३ | ६६,३४,०६८ | २,३३,८२,८६५ | २२% |

९. पुढील तथ्यांद्वारे ह्याला आणखी पुष्टी मिळते:

ए) एमएफएवर स्वाक्षरी केल्यानंतर, तुम्ही एसएचएसपीएल कडून डीएचआय प्रक्रिया/ सत्रांसाठी आवश्यक असलेली उपकरणे आणि उपभोग्य वस्तू खरेदी करत आहात. आम्हाला अलीकडेच एप्रिल २०२२ ते मार्च २०२५ पर्यंत या ३ वर्षात एसएचएसपीएल कडून तुम्ही केलेल्या खरेदीशी संबंधित डेटा सापडला आणि मिळवला. या डेटावरून असे दिसून येते की तुम्ही २,१०० आयताकृती गुलाबी कापड आणि १,५८५ एक्सट्रॅक्शन पंचेस खरेदी केले आहेत, जे परिशिष्ट १ मध्ये जोडलेल्या इनव्हॉइस (बीजक)च्या सारांशातून दिसून येते. तुम्हाला चांगलेच माहिती आहे आणि तसेच हा डेटा दर्शविते की तुम्ही किमान १,५८५ आयताकृती सत्रे केली आहेत आणि पुढील एका केस प्रत्यारोपणाच्या तुलनेत, तुम्ही त्याच कालावधीत मुंबई, पुणे, अहमदाबाद आणि

नागपूरमधील ४ क्लिनिकमधून फक्त ५०७ सत्रे नोंदवली आहेत. आठ वर्षांपूर्वी, २०१५ ते २०१७ या कालावधीत, जेव्हा तुम्ही एसएचएसपीएल चे उप -फ्रँचायझी होता, तेव्हा एका मुबई क्लिनिकने ३ वर्षात ६३० सत्रे नोंदवली होती, तर गेल्या ३ वर्षात तुम्ही मुंबई क्लिनिकसाठी फक्त ३३६ सत्रे नोंदवली होती.

बी) तुम्ही ३ वर्षात नोंदवलेल्या ५०७ सत्रांपैकी सरासरी सत्र किंमत ("एएसपी") फक्त रुपये १२७,०६७/- आहे. जानेवारी २०२२ ते मार्च २०२४ या कालावधीत , एसएचएसपीएलने रुपये २२८,२५८ /- चा एएसपी नोंदवला. म्हणूनच, गेल्या ३ वर्षात तुम्ही नोंदवलेला एएसपी हा एसएचएसपीएल ने नोंदवलेल्या एएसपी च्या जवळपास अर्धा आहे, जो उर्वरित भारतात देखील क्लिनिक चालवतो. ८ वर्षांपूर्वी, जानेवारी २०१५ ते डिसेंबर २०१७ या कालावधीत, जेव्हा तुम्ही एसएचएसपीएल चे उप-फ्रँचायझी होता, तेव्हा तुम्ही रुपये २४९,७५२ /- चा एएसपी नोंदवला होता. तुम्ही नोंदवलेल्या विक्रीची माहिती, सत्रांची संख्या, एएसपीआणि तुलना परिशिष्ट २ मध्ये दिली आहे.

सी) या डेटावरून आणि तुमच्या खात्यांचे आणि कामकाजाचे फॉरेन्सिक ऑडिट प्रलंबित असताना, आम्ही असा निष्कर्ष काढला आहे की तुम्ही गेल्या ३ वर्षात एएसपी वर रुपये २२८,२५८ /- किमतीचे १,५८५ केस प्रत्यारोपण सत्र केले आहेत, म्हणजेच त्याच कालावधीत नोंदवलेल्या रुपये ६४,४२२,९७५/- च्या विक्रीच्या तुलनेत एकूण रुपये ३६१,७८८,४८९/- ची विक्री झाली आहे. या डेटानुसार, तुम्ही गेल्या ३ वर्षात प्रत्यक्ष विक्रीच्या फक्त १८% विक्री नोंदवली आहे.

१०. या परिस्थितीत आणि तुमच्या खात्यांचे आणि कामकाजाचे योग्य आणि तपशीलवार फॉरेन्सिक ऑडिट प्रलंबित असताना, हे स्पष्ट आहे की तुम्ही गेल्या ३ वर्षात जाणूनबुजून, आणि फसवणूकीने प्रत्यक्ष विक्रीच्या फक्त २० % विक्री नोंदवली आहे. गेल्या ३ वर्षात तुम्ही ६४,४२२,९७५/- रुपयांची विक्री नोंदवली असल्याने, न नोंदवलेल्या विक्रीचे प्रमाण रुपये २५७,६९१,९०२/- आहे आणि अशा दडपलेल्या विक्रीवरील कमी भरलेली रॉयल्टी रुपये १८,०३८,४३३ /- आहे.

११. वर नमूद केल्याप्रमाणे, तुम्ही (ए ) जानेवारी २०२५ पासून आजपर्यंत रॉयल्टी भरण्यात अयशस्वी झाला आहात; आणि (बी ) एप्रिल २०२५ पासूनच्या विक्रीच्या आकडेवारीचा अहवाल द्या, जे एमएफए अंतर्गत तुमच्या दायित्वांचे भौतिक आणि मूलभूत उल्लंघन आहे. परिणामी, आम्हाला भारतीय रुपये १५,३८३,३९१/- (जानेवारी ते मार्च २०२५ पर्यंत) आणि अज्ञात रकमेवर (एप्रिल २०२५ पासून आजपर्यंत) देय रॉयल्टीचे नुकसान झाले आहे.

१२. हे स्पष्ट आहे की तुम्ही व्यवसायामधून संपूर्ण विक्रीची माहिती जाणूनबुजून, आणि फसवणूकीने दडपून ठेवत आहात आणि एमएफए च्या कलम ६.१ चे उल्लंघन करून एमएफए अंतर्गत रॉयल्टी कमी देत आहात. एप्रिल २०२५ मध्ये तुम्हाला सूचना देण्यात आल्या असूनही, तुमच्या वर्तनावरून असे दिसून येते की तुमचा कधीही एमएफए च्या अटींचे पालन करण्याचा कोणताही हेतू नव्हता आणि हे लक्षात आणून देण्यात आल्यानंतरही, तुम्ही एमएफए च्या मुळाशी जाणारे हे उल्लंघन ठीक करण्याचा

कोणताही प्रयत्न करण्यात अयशस्वी झाला आहात तसेच तुम्ही प्रतिसाद देण्यातही अयशस्वी झाला आहात. या परिस्थितीत, आम्हाला एमएफए तात्काळ प्रभावाने संपुष्टात आणण्यास भाग पाडले जात आहे. त्यानुसार, एमएफए अंतर्गत तुमचे सर्व अधिकार तात्काळ प्रभावाने संपुष्टात आले आहेत.

२१. अशाप्रकारे, २०१८ चा एमएफए प्रतिवादी क्रमांक १ ने गेल्या ३ वर्षात वादीने कमी विक्रीचा अहवाल दिल्याचा आणि दडपशाही केल्याचा आरोप करून संपुष्टात आणला आहे. वर निरीक्षणास आल्याप्रमाणे , २०१८ च्या एमएफए च्या कलम-६.१ अंतर्गत वादींनी प्रतिवादीं क्रमांक १/२ यांना प्रदेशातील सर्व क्लिनिकमधून व्यवसायातून वसूल केलेल्या आणि बिल केलेल्या एकूण रकमेवर ७% दराने रॉयल्टी देणे आवश्यक होते. प्रतिवादी क्रमांक १ च्या मते, वादींनी गेल्या ३ वर्षात १५८५ केस प्रत्यारोपण सत्रे केली आहेत ज्यात एकूण ३६,१७,८८,४८९/- रुपये विक्री झाली आहे, तर ६,४४,२२,९७५/- इतकी विक्री झाली आहे. प्रतिवादी क्रमांक १ च्या मते, गेल्या ३ वर्षात प्रत्यक्ष विक्रीच्या फक्त २० % विक्री वादींनी नोंदवली आहे आणि नोंदवले न गेलेल्या विक्रीचे प्रमाण रु.२५,७६,९१,९०२/- आहे आणि अशा दडपलेल्या विक्रीवर कमी रॉयल्टी रु.१,८०,३८,४३३/- आहे.

२२. वादींविरुद्ध कमी विक्रीचे अहवाल देण्याचा आरोप करण्याची हि पहिलीच वेळ नाही. २९ एप्रिल २०२५ रोजी, प्रतिवादी क्रमांक ४ चे श्री. प्रवीण अगरवाल यांनी वादींना ईमेल पाठवला होता ज्यामध्ये प्रतिवादी क्रमांक ३ च्या नावे भारतासाठी डीएचआय ब्रँडमधील

आयपी अधिकार हस्तांतरित करण्याचा संदर्भ देण्यात आला होता आणि त्या ईमेलमध्ये

कमी विक्रीचे अहवाल देण्याचा आरोप स्पष्टपणे उपस्थित करण्यात आला होता. वादींनी २९ एप्रिल २०२५ रोजीचा ईमेल प्राप्त झाल्याचे नाकारलेले नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, वादींनी २९ एप्रिल २०२५ रोजीचा ईमेल प्राप्त होऊनही कमी विक्रीच्या कमी अहवालाच्या विशिष्ट आरोपांना उत्तर न देणे पसंत केले. वादीचा प्रतिसाद आता दुप्पट आहे, (१) वादींनी रुग्णांवर आकारलेल्या शुल्कात डीएचआय सेवांव्यतिरिक्त इतर विविध शुल्क समाविष्ट आहेत आणि अशा शुल्कावरील रॉयल्टी प्रतिवादी क्रमांक १ सोबत सामायिक करण्याची आवश्यकता नव्हती आणि (२) कमी विक्री अहवाल देण्याचा आरोप प्रतिवादींमध्ये सामील झालेल्या वादींच्या असंतुष्ट माजी कर्मचाऱ्याने प्रतिवादींना दिलेल्या चुकीच्या माहितीवर आधारित आहे.

२३. वादींच्या पहिल्या प्रतिसादाबाबत, उत्तरातील संबंधित युक्तिवाद परिच्छेद-२४ आणि २५ मध्ये आढळतील जे पुढीलप्रमाणे आहेत :-

> २४. श्री. प्रीतम-कदम यांनी उघड केलेल्या व्हॉट्सॲप संदेशांच्या आधारे, प्रतिवादींचा असा आरोप आहे की एका विशिष्ट रुग्णाकडून आकारण्यात येणारे प्रत्यक्ष शुल्क हे वादींनी प्रतिवादी क्रमांक १/२ ला दिलेल्या शूल्का पेक्षा खूपच जास्त होते. व्हॉट्सॲप संदेशांमध्ये रुग्णाचे नाव, त्याचे वय, उपचार, क्षेत्र, कार्यकाळ, तारीख आणि रुग्णाने विनंती केलेल्या सेवांसाठी रुग्णाने दिलेले / मान्य केलेले पॅकेज दर्शविले आहे. हे लक्षात घेणे उचित आहे की वादींनी मान्य केलेल्या / देऊ केलेल्या पॅकेजमध्ये डीएचआयशी संबंधित सेवा, डीएच आय

संबंधित नसलेल्या केसांच्या उपचार सेवा जसे की प्लेटलेट-रिच प्लाझ्मा (पीआरपी) ग्रोथ फॅक्टर कॉन्सन्ट्रेट (जीएफसी ), स्टेम-सेल आधारित थेरपी जसे की ॲडिपोज-डेरिव्हेड स्टेम-सेल (एडीएससी ) थेरपी आणि नाभीसंबंधी दोर पेशी यांचा समावेश होता,वाढीचे घटक पुरवण्यासाठी एक्सोसोम्स, उपचारांना उत्तेजन देण्यासाठी मायक्रोनीडलिंग, फॉलिकल्स सक्रिय करण्यासाठी लो-लेव्हल लेसर थेरपी (एलएलएलटी ) आणि चरबीयुक्त स्टेम-सेल उपचार इत्यादींचा समावेश होता. पॅकेजमध्ये बेड-चार्जेस, नर्सिंग चार्जेस, डिस्पोजेबल आयटम चार्जेस, सर्जिकल-कन्झ्युएबल, प्रवेश आणि नोंदणी शुल्क, औषधे इत्यादींचा समावेश होता. प्रतिवादी खोटेपणाने असे दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत की संपूर्ण पॅकेज डीएचआय संबंधित काम आहे. २०१८ च्या एमएफए नुसार, वादींना उप-फ्रेंचायझी करार अंमलात आणून डीएचआय व्यवसाय करण्यासाठी, प्रोत्साहन देण्यासाठी आणि विकसित करण्यासाठी नियुक्त केलेल्या प्रदेशातील विविध क्लिनिक ओळखणे आणि त्यांना नियुक्त करणे आवश्यक होते. वादींद्वारे चालवले जाणारे क्लिनिक केवळ डीएचआय संबंधित सेवा देत नाहीत. असे क्लिनिक केस उपचार सेवा देखील प्रदान करतात ज्या डीएचआय तंत्रज्ञानाशी संबंधित नाहीत. एमएफए नुसार, वादींना क्लिनिकची निवड करणे आणि उघडणे, व्यवसायाचे संचालन, प्रदान करायच्या सेवांचे शुल्क आणि किंमत व्यवस्था इत्यादी बाबतीत पूर्ण 'विवेक'

होता. शिवाय, वादी सर्व क्लिनिकद्वारे व्यवसायाकडून बिल केलेल्या आणि वसूल केलेल्या एकूण रकमेच्या ७% किंवा प्रतिवादी क्रमांक १ आणि / किंवा २ पेक्षा जास्त असलेल्या रकमेच्या दरमहा १८०० युरो रॉयल्टी देण्यास जबाबदार होते. असे प्रदान प्रत्येक तिमाहीच्या सुरुवातीला तिमाहीने द्यावे लागणार होते. वादींनी २०१८ च्या एमएफए च्या अशा अटींचे पालन केले आहे आणि नेहमीच प्रतिवादी क्रमांक १/२ ला खरी आणि योग्य विक्री कळवली आहे.

२५. वादींच्या मुंबई क्लिनिकने २०१८ च्या एमएफए अंतर्गत वादींना उपलब्ध असलेल्या विवेकाधिकाराचा वापर विक्री जास्तीत जास्त करण्यासाठी आणि डीएचएल संबंधित व्यवसाय विकसित करण्यासाठी आणि एकाच क्लिनिक अंतर्गत रुग्णांना अनेक केस उपचार सेवा देण्यासाठी केला. रुग्णांना त्यांच्या उपचारांसाठी इनव्हॉइस-आधारित शुल्कापेक्षा एकरकमी पॅकेजेस घेणे अधिक सोयीस्कर आणि अनुकूल वाटले. अनेक रुग्णांनी, विशेषतः सेलिब्रिटींनी, रुग्णांच्या केसांशी संबंधित समस्या उघड होऊ नयेत आणि गोपनीयता राखण्यासाठी केस उपचार सेवेच्या तपशीलांसह इनव्हॉइस जारी करू नयेत अशी विनंती केली. अशा प्रकरणांमध्ये, रुग्णांनी केस उपचार सेवा घेण्यासाठी त्यांनी दिलेल्या रकमेचीच पावती मागितली. श्री. प्रीतम कदम यांना अशा रुग्णांची आणि त्यांच्याशी केलेल्या व्यवहारांची माहिती आहे. व्हॉट्सअॅप संदेशांमध्ये नमूद केलेले असे पॅकेज संपूर्ण उपचारांसाठी आणि क्लिनिक

शुल्कासाठी आहे, ज्यामध्ये डीएचआयशी संबंधित काम समाविष्ट आहे, याची माहिती श्री. प्रीतम कदम यांना आहे. गेल्या ६ ते ७ वर्षांपासून प्रतिवादी क्रमांक १/२ सह वादींनी ही पद्धत स्वीकारली आहे आणि चालू ठेवली आहे. प्रतिवादी क्रमांक १/२ ने मुंबई क्लिनिकमध्ये कमी विक्री नोंदवल्याबद्दल कोणताही आक्षेप किंवा चिंता व्यक्त केली नाही. श्री. प्रीतम कदम यांनी प्रतिवादींशी संगनमत करून केलेले वर्तन हे असद्भावी आणि खोडसाळ आहे. श्री. प्रीतम कदम यांनी वादींना त्यांच्या मुंबईतील क्लिनिकच्या संदर्भात वादींच्या इनव्हॉइसिंग आणि देय रक्कम पद्धती बद्दल माहिती द्यायला हवी होती. विशेष म्हणजे वादींनी चालवलेल्या पुणे क्लिनिकवर प्रतिवादींनी कोणतेही आरोप केलेले नाहीत.

२४. प्रतिवादी क्रमांक १ च्या उपकरणे आणि उत्पादनांचा वापर करून केस पुनर्संचयित करण्याच्या सेवा प्रदान करण्याच्या व्यवसायाच्या संदर्भात प्रतिवादी क्रमांक १ ला रॉयल्टी देय होती या वादाच्या समर्थनार्थ २०१८ च्या एमएफएच्या कलम-१.१ मध्ये 'व्यवसाय' या संज्ञेच्या व्याख्येवरही वादींनी भिस्त ठेवली . वादींच्या मते, रुग्णांनी प्लेटलेट-रिच प्लाझ्मा (पीआरपी), ग्रोथ फॅक्टर कॉन्सन्ट्रेट-(जीएफसी), स्टेम सेल आधारित थेरपी इत्यादी अनेक गैर-डीएचआय संबंधित केस उपचार सेवांचा लाभ घेतला आहे आणि रुग्णांना देण्यात येणाऱ्या पॅकेजेसमध्ये बेड चार्जेस, नर्सिंग चार्जेस, डिस्पोजल आयटम चार्जेस, सर्जिकल कंझ्युमेबल, प्रवेश आणि नोंदणी शुल्क, औषधे इत्यादींचा समावेश आहे जे डीएचआय संबंधित कामाचा भाग नाहीत.

२५. प्रतिवादींनी, वादीने एकाच रुग्णाशी संबंधित व्हॉट्सअॅप संदेशांविरुद्ध विविध रुग्णांवर तयार केलेल्या इनव्हॉइसचा तुलनात्मक तक्ता रेकॉर्डवर ठेवला आहे. सदर तक्ता हे दर्शवतो की इनव्हॉइसची रक्कम आणि रुग्णांना आकारण्यात येणाऱ्या प्रत्यक्ष रकमेत मोठी तफावत आहे. उदाहरणार्थ, रुग्ण श्री. राहुल शिर्के यांना डीएचआय साठी ४,००,०००/- आणि पीआरपी साठी १५,०००/- रुपये आकारले जातात, तर सदर रुग्णाच्या बाबतीतील बिल फक्त १,१८,०००/- रुपये जीएसटी सह आहे. विशेषतः, व्हॉट्सअॅप संदेशमध्ये डीएचआय (४ लाख रुपये) आणि पीआरपी (१५,०००/- रुपये) साठी वेगवेगळे शुल्क दर्शविले आहे, ज्यामुळे वादीने प्रतिसादात घेतलेल्या खोट्या बचावाला आधार दिला जातो. त्याचप्रमाणे दुसऱ्या रुग्णाचे, डॉ. चिराग देसाई यांचेही प्रकरण आहे, ज्यांच्याकडून डीएचआयसाठी २,३०,०००/- रुपये आणि पीआरपी साठी १५,०००/- रुपये आकारले जातात परंतु बिल रक्कम फक्त १,१८,०००/- रुपये आहे जीएसटीसह. अशी अनेक उदाहरणे आहेत जिथे वादींनी रुग्णांकडून वसूल केलेल्या शुल्काच्या तुलनेत सेवांचे बिल खूपच कमी केले आहे. त्यामुळे समाप्ती सूचना मधील आरोपांचा खरेपणा गृहीत धरण्यासाठी प्रथमदर्शनी पुरेसा घटक आहे. तसेच प्रासंगिकता अशी आहे की संबंधित रुग्णांना डीएचआयशी संबंधित नसलेल्या सेवा प्रदान केल्या गेल्या आहेत असा अस्पष्टपणे दावा करताना, वादींनी डीएचआयशी संबंधित नसलेल्या सेवांसाठी बिलाच्या स्वरूपात सदर दाव्याचे समर्थन करण्यासाठी कोणताही पुरावा सादर केलेला नाही.

२६. वादींनी पुढील तीन वर्षांसाठी १ मार्च २०१८ रोजी झालेल्या करारानुसार 'मास्टर

फ्रँचायझी अग्रीमेंट ' अंतर्गत वादींच्या अंदाजे उत्पन्नपोटी ' २५ कोटी रुपयांचा दावा केला आहे. पुढील तीन वर्षांमध्ये २५ कोटी रुपयांच्या संभाव्य कमाईच्या वादीच्या दाव्याच्या तुलनेत, गेल्या तीन वर्षात त्यांनी प्रतिवादींना नोंदवलेली विक्रीची आकडेवारी खूपच कमी आहे. समाप्तीच्या सूचनेतील परिशिष्ट-२ मध्ये असे सूचित केले आहे की गेल्या तीन वर्षात वादींनी नोंदवलेल्या विक्रीच्या आकडेवारीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे:-

२०२२-२३ : २.१२ कोटी रुपये

२०२३-२४ : २.५० कोटी रुपये

२०२४-२५ : १.८१ कोटी रुपये

वरील आकडेवारी पुन्हा एकदा वादींनी त्यांच्या पुढील तीन वर्षांच्या उत्पन्नाच्या अंदाजाशी तुलना केल्यास ती एकूण कमी विक्रीच्या अहवालाचे संकेत देते . २०१५-१७ मध्ये प्रतिवादी क्रमांक ३ ने देसाई आणि एआरएस ग्रुपचे जे.व्ही. आणि एआरएस ग्रुप म्हणून काम करताना नोंदवलेल्या विक्रीच्या आकडेवारीशी तुलना केल्यास वरील आकडेवारी पुढीलप्रमाणे होती:

२०१५ : ६.६८ कोटी रुपये

२०१६: ६.२१ कोटी रुपये

२०१७: ५.८८ कोटी रुपये

प्रतिवादी क्रमांक ३ ची वरील आकडेवारी संपूर्ण भारतासाठी असू शकते परंतु जरी वरील

आकडेवारीपैकी ५०% आकडेवारी विचारात घेतली तरी, वादींद्वारे कमी विक्रीचा अहवाल मोठ्या प्रमाणात आहे. काय संबंधित आहे तर मागील तीन वर्षात वादींद्वारे २०१५-१६ मध्ये वादींनी नोंदवलेल्या सरासरी सत्र किमतीची तुलना रु. १२७०६७/- इतकी आहे जी खरेतर २०१५-१६ मध्ये रु. २,२८,२५८/- इतकी होती जेव्हा वादी एआरएस ग्रुपबरोबर संयुक्त उपक्रमात होते.

२७. मला खात्री आहे की वादींनी प्रतिवादी क्रमांक १ ला ७% रॉयल्टी देण्याचे दायित्व टाळण्यासाठी कमी विक्रीचे अहवाल देण्याचे घोर कृत्य केले आहे. म्हणून, २०१८ च्या एमएफएच्या समाप्तीचे कारण प्रथमदर्शनी वैध असल्याचे आढळून आले आहे.

२८. कमी विक्रीचा अहवाल देण्याच्या आरोपांना सामोरे जाण्यास असमर्थतेच्या अडचणीचा सामना करत, वादींनी २०१८ च्या एमएफएच्या कलम १०.१ अंतर्गत कायदेशीर सूचना जारी करण्यात अयशस्वी झाल्यामुळे समाप्ती वाईट असल्याचा युक्तिवाद केला आहे. एमएफएचे कलम-१० समाप्तीशी संबंधित आहे. कलम १०.१ आणि १०.२ पुढीलप्रमाणे आहे :-

१०. समाप्ती

१०.१ कोणताही पक्ष खालील अटींवर हा करार रद्दबातल करू शकतो:

(१) उपपरिच्छेद १०.२ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, तीस (३०) दिवसांच्या आत कसूर ची घटना दुरुस्त करण्यात दुसऱ्या पक्षाकडूनअपयश.

(२) उपपरिच्छेद १०. ३ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, कोणत्याही अनियंत्रित प्रसंगी साठ (६०) दिवसांपेक्षा जास्त काळ अस्तित्वात राहणे.

१०.२ जर कोणताही पक्ष या करारात नमूद केलेल्या कोणत्याही जबाबदाऱ्या, आवश्यकता, अटी किंवा शर्ती किंवा या कराराशी जोडलेल्या कोणत्याही जोडणीचे पालन करण्यात अयशस्वी झाला तर " कसूरची घटना" घडेल; या करारात प्रवेश करताना किंवा एमएफए च्या अनुषंगाने त्याच्या जबाबदाऱ्या पार पाडताना कोणत्याही पक्षाने केलेल्या कोणत्याही चुकीच्या माहितीच्या बाबतीत देखील कसूरची घटना घडेल. जर कोणत्याही कृतीमुळे या एमएफए नुसार काम करण्याची फ्रँचायझींची क्षमता लक्षणीयरीत्या कमी झाली तर ती कसूरची घटना मानली जाईल.

२९. अशा प्रकारे, कसूरची घटना घडल्यानंतर जर दुसरा पक्ष ३० दिवसांच्या आत करार दुरुस्त करण्यात अयशस्वी झाला तरच करार संपुष्टात येऊ शकतो. वादींच्या मते, जरी असे गृहीत धरले गेले की वादींनी कोणतीही कसूर केली आहे, तरी तो समाप्तीपूर्वी ३० दिवसांच्या कायदेशीर सूचनेस पात्र होता. वादींच्या म्हणण्यानुसार, त्यांना ३० दिवसांच्या आत कसूर दुरुस्त करण्याची संधी देण्यात आली होती. वादींनी प्रतिवादी क्रमांक १ ला देय रॉयल्टी देण्यास टाळाटाळ करण्याच्या गुप्त हेतूने विक्रीची आकडेवारी दडपण्याचे गंभीर कृत्य केल्याचे प्रथमदर्शनी आढळून आल्याने, कायदेशीर सूचना न जारी करण्याच्या तांत्रिक कारणामुळे समाप्तीची सूचना स्थगित करावी या युक्तीने मला खरोखर प्रभावित केले नाही. ही दुसरी बाब

आहे की वादींना २९ एप्रिल २०२५ रोजीच्या ईमेलद्वारे विशेषतः इशारा देण्यात आला होता की त्यांची विक्री खूपच कमी होती . २९ एप्रिल २०२५ रोजीच्या ईमेलचा संबंधित भाग पुढीलप्रमाणे आहे:

> व्यवसायाचे प्रमाण अत्यंत कमी पाहून आम्हाला आश्चर्य वाटले. तुम्ही फेब्रुवारीमध्ये मुंबईत फक्त ९ सत्रांमध्ये फक्त ८.४६ लाख रुपयांची एकूण विक्री नोंदवली आहे ज्याची सरासरी किंमत प्रति सत्र फक्त ९४ ,०००/- रुपये आहे. हे सरासरी १६.५ रुपये प्रति केस आहे. शिवाय, फेब्रुवारीमध्ये पुणे, अहमदाबाद आणि नागपूरच्या क्लिनिकमध्ये कोणत्याही विक्रीची नोंद झालेली नाही.
>
> मार्च २०२५ मध्येही तुम्ही मुंबईत फक्त १४ सत्रे आणि पुण्यात २ सत्रे झाली आणि एकूण १५.७५ लाख रुपये विक्री झाली. पुन्हा एकदा नोंदवलेले मूल्य अत्यंत कमी आहे म्हणजेच प्रति सत्र ९८ हजार रुपये आणि प्रति केस किंमत फक्त १४.४ रुपये आहे.
>
> पश्चिम भारतातील प्रदेश खरेदी करण्यासाठी तुम्ही आमच्यासोबत शेअर करत असलेल्या सूचक आकडेवारीच्या हे पूर्णपणे विरुद्ध आहे, ज्यानुसार विक्री नोंदवलेल्यापेक्षा किमान ८ ते १० पट जास्त असावी.
>
> विक्रीची नोंद करण्यात काही चूक झाली आहे असे दिसते. आम्ही तुम्हाला ३० एप्रिल २०२५ पर्यंत योग्य विक्रीचे पुनरावलोकन करून आम्हाला

कळवण्याची विनंती करतो जेणेकरून आम्ही रॉयल्टीच्या योग्य रकमेसाठी इन्व्हॉईस तयार करू शकू.

३०. अशा प्रकारे वादींना स्पष्टपणे सूचना देण्यात आली की ते २९ एप्रिल २०२५ रोजीच विक्रीचा अहवाल देत नाहीत. वादींनी असा बचाव केला आहे की २९ एप्रिल २०२५ रोजीचा ईमेल ही कसूर सुधारित करण्याची संधी नव्हती आणि कोणत्याही परिस्थितीत तो प्रतिवादी क्रमांक ४ श्री प्रवीण अग्रवाल यांनी जारी केला होता, प्रतिवादी क्रमांक १ ने जारी केला नव्हता. या टप्प्यावर मी दोन्ही बचावांनी प्रभावित झालो नाही. ईमेलने स्पष्टपणे वादींना ३० एप्रिल २०२५ पर्यंतच्या विक्रीचा आढावा घेण्याची आणि योग्य रॉयल्टीसाठी इनव्हॉइस तयार करण्याची विनंती केली होती. अशा प्रकारे, सदर इमेलमध्ये कसूर सुधारित करण्याची स्पष्ट संधी देण्यात आली होती. वादींनी सदर ईमेलला प्रतिसाद न देण्याचा निर्णय घेतला. त्यांनी विक्री कमी झाल्याच्या आरोपावर वाद घातला नाही किंवा कसूर सुधारित केली नाही. जोपर्यंत ईमेलच्या लेखकाचा संबंध आहे, तो ईमेल विक्रीची आकडेवारी सांगण्याची आणि एमएएफए अंतर्गत प्रतिवादी क्रमांक ३ ला रॉयल्टी देण्याच्या वादींच्या दायित्वाचा संदर्भ देतो. ईमेलच्या पुढील मजकुरावरून हे स्पष्ट होते.

तुम्हाला असेही कळवण्यात आले आहे की १ फेब्रुवारी २०२५ पासून तुम्हाला फ्रँचायझी करारानुसार सिल्व्हरमॅपलला विक्रीचा अहवाल आणि रॉयल्टी द्यावी लागेल. आम्हाला नुकताच डीएचआय ग्लोबल कडून तुमच्या प्रदेशांसाठी फेब्रुवारी आणि मार्च २०२५

रोजीचा विक्री अहवाल मिळाला आहे, ज्याचा सारांश विश्लेषण जोडला आहे.

३१. या टप्प्यावर २०१८ च्या एमएफए अंतर्गत रॉयल्टी मिळविण्यासाठी प्रतिवादी क्रमांक ३ चा हक्क या मुद्द्यात जाणे आवश्यक नाही. हे लक्षात घेणे पुरेसे आहे की वादीला एक विशिष्ट सूचना देण्यात आली होती की तो विक्रीचा अहवाल देत नाही आणि त्याला कसूर दुरुस्त करण्याची संधी देखील देण्यात आली होती. या प्रकरणाच्या दृष्टीने, श्री. कामत यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ ( उपरोल्लेखित ) या प्रकरणातील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवणे योग्य आहे. अन्यथा, परिच्छेद-७२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणातील तथ्ये विचारात घेऊन न्यायनिर्णय देण्यात आला आहे आणि हा न्यायनिर्णय प्रत्येक बाबतीत कायदेशीर सूचना जारी करण्यात अयशस्वी झाल्यास समाप्ती अवैध ठरवावी अशा एका अमूर्त प्रस्तावाच्या समर्थनार्थ उद्धृत केला जाऊ शकत नाही.

३२. मी आधीच प्रतिवादी क्रमांक १ ला देय रॉयल्टी न देण्याच्या तिरकस उद्देशाने योग्य विक्री आकडेवारी दडपण्यात वादींच्या वर्तनाचे निरीक्षण केले आहे. . वादी २०१८ च्या एमएफए च्या विशिष्ट कामगिरीची मागणी करत आहे. विशिष्ट सहाय्य अधिनियमाच्या कलम १६ अंतर्गत, कराराची विशिष्ट कामगिरी अशा व्यक्तीच्या बाजूने लागू केली जाऊ शकत नाही ज्याने कराराची फसवणूक केली आहे किंवा कराराशी जाणूनबुजून फरक केला आहे. अधिनियमाच्या कलम १६ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे:

> १६. सहाय्यासाठी वैयक्तिक प्रतिबंध . - कराराची विशिष्ट कामगिरी अशा व्यक्तीच्या बाजूने लागू केली जाऊ शकत नाही-

(ए ) ज्याने कलम २० अंतर्गत कराराची बदली कामगिरी मिळवली आहे; किंवा

(बी) जो कराराची कोणतीही आवश्यक मुदत पूर्ण करण्यास अक्षम झाला आहे, किंवा त्याचे उल्लंघन करतो, जो त्याच्याकडून अंमलात आणला जात नाही, किंवा कराराची फसवणूक करतो, किंवा जाणूनबुजून कृती करतो , कराराद्वारे स्थापित करायच्या असलेल्या संबंधाशी फरक किंवा त्याचे उल्लंघनाची कृती करतो ; किंवा

(सी ) जो हे सिद्ध करण्यात अयशस्वी ठरतो की त्याने कराराच्या आवश्यक अटी पूर्ण केल्या आहेत ज्या त्याने पूर्ण करायच्या आहेत, अटींव्यतिरिक्त ज्याची पूर्तता प्रतिवादीने रोखली आहे किंवा माफ केली आहे.

स्पष्टीकरण. कलम (सी ) च्या उद्देशांसाठी, -

(१) जिथे करारात पैसे देणे समाविष्ट आहे, तिथे वादीने प्रतिवादीला प्रत्यक्षात पैसे देणे किंवा न्यायालयात पैसे जमा करणे आवश्यक नाही, जोपर्यंत न्यायालय तसे निर्देश देत नाही तोपर्यंत ;

(२) वादीने कराराची कामगिरी किंवा त्याची तयारी आणि कामगिरीची तयारी त्याच्या खऱ्या रचनेनुसार पूर्ण करणे [सिद्ध] करणे आवश्यक आहे.

३३. प्रस्तुत प्रकरणात, विक्रीची आकडेवारी दडपवणे हे वादींचे वर्तन गंभीरपणे प्रथमदर्शनी कराराची फसवणूक करणारे कृत्य तसेच करारामध्ये जाणूनबुजून फरक करणारे कृत्य असेल. २०१८ चा एमएफए हा केस प्रत्यारोपणाशी संबंधित सेवांसाठी विकसित केलेल्या

तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रतिवादी क्रमांक १/२ द्वारे रॉयल्टी मिळविण्याच्या उद्देशाने अंमलात आणलेला एक व्यवसाय करार आहे. जर एखाद्या संस्थेने रॉयल्टी देण्याऐवजी अशा तंत्रज्ञानाचा वापर करण्याची परवानगी दिली असेल तर ती देय रॉयल्टी देण्यापासून वाचण्यासाठी विक्रीची खोटी आकडेवारी नोंदवते आणि असे कृत्य स्पष्टपणे करारातील फसवणूकीची कृती तसेच कराराशी जाणूनबुजून केलेल्या फरकाची कृती असेल. एकदा असे मानले गेले की वादी २०१८ च्या एमएफए अंतर्गत विशिष्ट कामगिरी अंतिम टप्प्यावरही मिळवू शकत नाही, तर २०१८ च्या एमएफए अंतर्गत कलम-१०.१ नुसार तांत्रिक कारणास्तव कायदेशीर सूचना जारी न करण्याच्या ‘ समाप्ती सूचनेला ’ला स्थगिती देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

३४. अन्यथा जरी वादी हे सिद्ध करण्यात यशस्वी झाले की कायदेशीर सूचना जारी करण्यात अयशस्वी झाल्यास समाप्ती अवैध ठरते, तरीही विशिष्ट सहाय्य अधिनियमाच्या कलम १६ च्या तरतुदी विचारात घेता, नुकसान भरपाईचा दावा करण्यासाठी ती आधार असू शकते, विशिष्ट कामगिरीसाठी ती आधार असू शकत नाही. म्हणून, जर वादी २०१८ च्या एमएफएच्या कलम-१०.१ नुसार काटेकोरपणे कायदेशीर सूचना जारी केली गेली नाही किंवा सूचना जारी न केल्याने समाप्ती अवैध ठरते हे सिद्ध करण्यात यशस्वी झाले तर वादीला नुकसान भरपाई देऊन भरपाई दिली जाऊ शकते. या संदर्भात भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (उपरोल्लेखित ) या प्रकरणातील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयावर श्री. डॉक्टर यांनी ठेवलेली भिस्त योग्य आहे . नवयुगा मछलीपट्टनम पोर्ट लिमिटेड ( उपरोल्लेखित ) या

प्रकरणातील आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय करार रद्द करण्याच्या मुद्द्याशी संबंधित आहे आणि तो प्रस्तुत प्रकरणातील तथ्यांना काटेकोरपणे लागू होऊ शकत नाही.

३५. २९ एप्रिल २०२५ रोजीच्या इमेलमध्ये दर्शविलेले कसूर पक्षांमधील नंतरच्या वाटाघाटींमुळे माफ करण्यात आले असा वादीचा युक्तिवाद स्वीकारण्यास पात्र नाही. वादीचे स्वतःचे प्रकरण आहे की प्रतिवादी क्रमांक ३ आणि ४ हे गेल्या काही काळापासून फ्रँचायझी व्यवसाय विकण्यासाठी त्यांच्यावर दबाव आणत आहेत. म्हणून, जर प्रतिवादींनी वादींना कमी व्यवसाय अहवाल दिल्याचे लक्षात आले असेल आणि त्या आधारावर, वादीकडून व्यवसायाची विक्री करण्याचा विचार केला जात असेल, तर असा युक्तिवाद करता येत नाही की वाटाघाटी करणे म्हणजे २९ एप्रिल २०२५ रोजीच्या ईमेलमध्ये दर्शविलेल्या कसूरच्या बाजूने वाटाघाटी करणे.

३६. वादींच्या वतीने असा दावा करण्यात आला कि प्रतिवादी क्रमांक १ ला २०१८ चा एमएफए संपुष्टात आणण्याचे अधिकार नाहीत. हा आक्षेप १७ जानेवारी २०२५ रोजीच्या पत्राच्या आधारे आहे ज्याद्वारे प्रतिवादी क्रमांक १ ने वादींना कळवले की प्रतिवादी क्रमांक ३ ने प्रतिवादी क्रमांक १ च्या जागी पाऊल ठेवले आहे आणि वादींना २०१८ च्या एमएफए अंतर्गत प्रतिवादी क्रमांक ३ ला रॉयल्टी देण्याचे निर्देश दिले आहेत. वर निरीक्षणास आल्याप्रमाणे, प्रतिवादी क्रमांक १ आणि प्रतिवादी क्रमांक ३ यांच्यातील नेमक्या व्यवस्थेचा खोलवर अभ्यास करणे आवश्यक नाही. २० नोव्हेंबर २०२४ आणि १२ मार्च २०२५ रोजी झालेल्या करारानुसार, वादीला १७ जानेवारी २०२५ रोजीच्या पत्राद्वारे, २०१८ च्या एमएफए

अंतर्गत प्रतिवादी क्रमांक ३ ला रॉयल्टी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या टप्प्यावर असा निष्कर्ष काढण्यासाठी हे पुरेसे नाही की प्रतिवादी क्रमांक १ ने एमएफए अंतर्गत त्याचे सर्व अधिकार किंवा हक्क सोडले आहेत. खरं तर, प्रतिवादी क्रमांक १ च्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला आहे की २० नोव्हेंबर २०२४ रोजीचा आयपी नियुक्ती करार हा पूर्णपणे वेगळ्या संस्थेद्वारे - डेस्कपो अंमलात आणला गेला आहे , ज्याचा परिणाम केवळ आयपी अधिकार नियुक्त करण्याचा आहे आणि एमएफए मधून उध्दभवलेले सर्व अधिकार आणि दायित्वे नियुक्त करण्याचा नाही. या बाबीचा विचार दाव्याच्या अंतिम निर्णयाच्या वेळी केला जाऊ शकतो आणि समाप्तीचा आदेश अशा निष्कर्षाने थांबवता येत नाही की तो एखाद्या संस्थेने जारी केला आहे ज्याचे स्थान नाही.

३७. म्हणून माझे असे मत आहे की वादी त्यांच्या बाजूने तात्पुरता मनाई आदेश मंजूर करण्यासाठी कोणतेही प्रथमदर्शनी प्रकरण सिद्ध करण्यात पूर्णपणे अयशस्वी ठरले आहेत. खरं तर, त्यांचे वर्तन असे आहे की या न्यायालयाने वादीच्या बाजूने कोणतेही न्याय्य अधिकारक्षेत्र वापरला नाही हे समर्थनीय ठरेल. तथापि, याचा अर्थ असा नाही की हे न्यायालय केवळ वर्तनाच्या आधारावर तात्पुरता मनाई आदेश नाकारत आहे. कायद्यातही, वादींनी कोणतेही प्रथमदर्शनी प्रकरण सिद्ध केले नाही. तात्पुरता मनाई आदेश नाकारल्यास वादींना अपूरणीय नुकसान होणार नाही कारण वादींनी स्वतः कबूल केले आहे की ते फ्रँचायझी व्यवसायाची विक्री करण्याचा विचार करत होते, याचा अर्थ असा की ते डीएचआय तंत्रज्ञान किंवा डीएचआय फ्रँचायझीशिवाय केस प्रत्यारोपण सेवा प्रदान

करण्यास सक्षम आहेत. जर वादी दाव्यात यशस्वी झाले तर त्यांना नुकसान भरपाई मिळू शकते. सुविधेचा समतोल हा वादीच्या विरोधात आणि प्रतिवादींच्या बाजूने देखील जोरदारपणे मांडला जातो. प्रतिवादींना दाव्याच्या प्रलंबित कालावधीत नियुक्त केलेल्या प्रदेशांमध्ये फ्रँचायझी व्यवसायाच्या संदर्भात दुसरा भागीदार नियुक्त करण्यापासून रोखले जाऊ शकत नाही. त्यामुळे तात्पुरत्या मनाई आदेशासाठी वादींनी केलेली विनंती नाकारली जाण्यास पात्र आहे.

३८. वादींनी दाखल केलेला अंतरिम अर्ज त्यानुसार नाकारला गेला आणि निकाली काढला गेला.

(न्या. संदीप व्ही.मारणे.)

---

<u>- : अस्वीकरण :-</u>

या न्यायनिर्णयाचा मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरता वैध मानला जाईल.

-X -X -X -X -X-